## प्रेसनोट दि. २३/७/२०१८

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन गुन्ह्यातील पाहीजे आरोपी कडुन १ गावठी बनावटीचे पिस्टल जप्त करुन आरोपीस अटक

दि.२३/७/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोहवा नरेश बलसाने व पोहवा ज्ञानेश्वर देवकर यांना बातमीदाराकडून बातमी मिळाली की, फरासखाना पोलीस स्टेशन गुरनं. ७७/२०१८ भादवि कलम ३६३,३६६(अ), २१२,३७६,१०९, प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्शुअल ऑफसेस ॲक्ट सन २०१२ चे कलम ३,४,६,७,८,१६,१७ यागुन्ह्यातील पाहीजे असलेला आरोपी नामे ऋषीकेश गायकवाड हा तोफखाना,शिवाजीनगर पुणे येथे येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा व स्टाफ यांनी तोफखाना शिवाजीनगर पुणे येथे जावुन आरोपी ऋषीकेश गायकवाड याचा शोध घेत असताना तो साईबाबा मंदिराच्या जवळ उभा असताना मिळुन आला. त्यास नाव पत्ता विचारले त्याने पुर्णनाव ऋषीकेश सुनिल गायकवाड वय २१ वर्षे रा. ११४३ कसबा पेठ, सातताेटी पोलीस चौकीच्या पाठीमागे, गादी कारखाना पुणे असे असल्याचे सांगितले, दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने ऋषीकेश गायकवाड याच्याकडे अधिक चौकशी केली असता सदर गुन्हयातील मुख्य आरोपी श्वेतांग निकाळजे याचेसह श्वेतांग निकाळजे याने पळवुन नेलेल्या [redacted] या मुलीसह काही दिवस पारगाव मेमाणे ता. पुरंदर जि.पुणे येथे राहिला होता असे सांगितले. ऋषीकेश गायकवाड याची अंगझडती घेतली असता त्याचे जिन्स पॅन्टचे पुढील खिशात १ गावठी बनावटीचे पिस्टल किमंत रुपये ३०,०००/- चे मिळुन आले. सदरचे पिस्टल हे सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी श्वेतांग निकाळजे याने ऋषीकेश गायकवाड याच्याकडे ठेवण्यासाठी दिले होते. तसेच दाखल गुन्ह्यातील पिस्टल जप्त करण्यात आले असुन ऋषीकेश गायकवाड यास गुन्ह्याचे चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्रीमती मनिषा झेंडे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजेद्र कचरे, कविता नलावडे यांनी केली आहे.